# प्रकरण पहिले

# ना. ग. गोरे चरित्र व भारतीय स्वतंत्र चळवळीतील सहभाग

प्रकरण १ ले

# ना. ग. गोरे चरित्र व भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग.

<u>प्रस्तावना</u> :

भारतात लोकशाही समाजवादी विचार आचार्य नरेंद्रदेव, जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया, एस.एम.जोशी, युसूफ मेहेरअली यांनी रूजवले त्यामध्ये ना.ग. गोरेंचा उल्लेख करावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतर लोकशाही समाजवादी विचार रूजावेत, वाढावेत यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. मार्क्सच्या विचारांचा ना. ग. गोरेंवर प्रभाव पडला होता. वाचन आणि विचारमंथन यामुळे ते समाजवादी बनले.

ना. ग. गोरे यांनी आपली वैचारिक वाटचाल तरूण वयातच निश्चित केली होती. तत्कालीन राजकीय आणि सामाजिक विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. स्वातंत्र्यलढ्यामध्ये ते सक्रिय सहभागी झाले होते. संघर्षमय जीवन त्यांनी अनुभवले होते. ना. ग. गोरे हे थोर स्वातंत्र्यसेनानी तत्वचिंतक आणि सामाजिक परिवर्तनवादी विचारांचे नेते होते. स्वातंत्र्य चळवळीबरोबरच आर्थिक विषमतेविरूध्द लढले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. ना. ग. गोरे यांच्यामते, समाज सुधारल्याशिवाय स्वराज्याची चळवळ एकजूट होऊ शकणार नाही. त्यांनी राजकीय चळवळीबरोबर सामाजिक चळवळींनाही प्राधान्य दिले.

ना. ग. गोरे समाजवादी विचारसरणीचे नेते होते. विद्यार्थी दशेत त्यांनी अनेक विचारवंतांचे ग्रंथ वाचले होते. त्यामुळे आपल्या समाजातील दोषांची जाणीव त्यांना झालेली होती. समाजातील सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी करण्यासाठी ते

समाजवादी चळवळीत सामील झाले. तत्कालीन परिस्थितीतील रूढी, परंपरा जाचक होत्या. दलितांना अस्पृश्य म्हणून वागवले जात होते. त्यांचा छळ केला जात होता. ही जन्माधिष्ठित विषमता नष्ट झाली पाहिजे असे ना. ग. गोरे यांना वाटत होते. समाजातील रूढी, परंपरा नष्ट होऊन समाज सुधारला पाहिजे या विचारांचे ते होते. ना. ग. गोरे यांच्या मते, स्वातंत्र्य मिळणे जसे आवश्यक आहे तसेच भारताच्या जनजीवनातील सामाजिक आर्थिक विषमता नष्ट झाली पाहिजे यातूनच समाजवादी पक्षाची स्थापना झाली. लोकशाही समाजवाद आणि शोषणरहित समाजनिर्मिती हे या पक्षाचे उद्दिष्ट होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला समतावादी स्वरूप कसे देता येईल यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

ना. ग. गोरे सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्य चळवळीला समाजवादी विचारांची व चळवळीची जोड दिली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही समाजवादी विचार रूजावा म्हणून ते प्रयत्नशील होते. ना. ग. गोरे यांचे राजकीय विचारांप्रमाणेच सामाजिक बाबतीतही विचार पुरोगामी आणि प्रखर सुधारणावादी होते. स्वातंत्र्याबरोबरच तत्कालीन परिस्थितीतील सामाजिक रूढी, परंपरेचे पाश नष्ट झाले पाहिजेत यासाठी ते प्रयत्नशील राहिले.

भारताचा स्वातंत्र्यलढा अधिक प्रखर करण्यासाठी राष्ट्रवादी भूमिकेबरोबरच समाजवादी विचारांची जोड देणे आवश्यक होते असे ना. ग. गोरे यांचे मत होते. यासाठी त्यांनी समाजवादी पक्षाच्या स्थापनेत सक्रिय सहभाग घेतला. समाजवादी चळवळीला वैचारिक साहित्य मिळावे म्हणून त्यांनी ललित लेखनही केले. ना. ग. गोरे यांचे राजकीय विचार पुरोगामी होते आणि सामाजिक दृष्टी ही, इतरांनी आदर्श घेण्यासारखी होती. भविष्य काळात राजकीय, सामाजिक क्षेत्रांमध्ये काम केलेल्या

ना. ग. गोरेंच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली, त्यासाठी कोणते पोषक वातावरण त्यांना मिळाले, कोणत्या व्यक्ती त्यांना मार्गदर्शक ठरल्या या सर्व गोष्टींचा विचार अपरिहार्य ठरतो.

**संशोधनाचा हेतू (उद्देश)**

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये ना. ग. गोरे यांचे विचार अभ्यासले जाणार आहेत. ते अनेक चळवळींमध्ये सहभागी झाले त्यापाठीमागे त्यांचा काय उद्देश होता हे अभ्यासले जाणार आहे. त्यांनी समाजवादाचा पुरस्कार केला होता. त्यांना अपेक्षित असणारा समाजवादाचा येथे अभ्यास केला जाणार आहे. त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास या शोध प्रबंधातून केला जाणार आहे.

१) ना. ग. गोरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे.

२) ना. ग. गोरे यांची स्वातंत्र्य चळवळीतील भूमिका अभ्यासणे.

३) ना. ग. गोरे यांच्या विविध राजकीय लढ्यातील सक्रिय सहभागाचा अभ्यास करणे.

४) त्यांची लोकशाही आणि समाजवादासंबंधीची मते समजावून घेणे.

५) ना. ग. गोरे यांच्या राजकीय विचारांचा आढावा घेणे.

६) भारतात समाजवादी विचार रूजविण्यास त्यांनी केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करणे.

ना. ग. गोरे यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. अहिंसात्मक लढ्याची शिकवण त्यांनी गांधीजींच्या विचारातून आत्मसात केली. स्वातंत्र्यानंतर ज्या विविध चळवळी झाल्या विशेषतः संयुक्त महाराष्ट्र गोवा

मुक्ती, कानगार चळवळ यांना अहिंसात्मक आणि विधायक दिशा देण्याचे काम ना. ग. गोरे यांनी केले आहे. या चळवळींचा अभ्यास चिकित्सक पद्धतीने करणे.

त्याचप्रमाणे भारतात समाजवादी विचार रूजण्यास त्यांनी केलेले कार्य महत्त्वाचे आहे. समाजवादाला लोकशाहीची जोड दिली पाहिजे. त्यासाठी पक्ष संघटना बांधली पाहिजे. या सर्वांना वैचारिक पाठिंबा मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी केलेल्या सक्रिय कार्याचा अभ्यास चिकित्सक पद्धतीने प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक संदर्भ साधनांच्या मदतीने अभ्यास करण्यात आला आहे. प्राथमिक साधनांच्या मध्ये ना. ग. गोरे यांचे ग्रंथ विशेषतः नारायणी, तिमिरातून तेजाकडे (साधना विशेषांक) त्यांची इतर पुस्तके आणि त्यांचे विविध वृत्तपत्रीय लेख, साधनेचे संपादक म्हणून त्यांनी लिहिलेले लेख, त्यांनी दिलेल्या मुलाखती यांचा आधार घेण्यात आला आहे.

तर दुय्यम साधनांच्या मध्ये तत्कालीन वृत्तपत्रे, साप्ताहिक, संदर्भीय कागदपत्रे, समकालीन व्यक्तींच्या मुलाखती, रोजनेशी, आत्मचरित्र, डायऱ्या, पत्रव्यवहार आणि त्यांच्यावर लिहिलेले इतर संदर्भीय ग्रंथ विशेषतः ग. प्र. प्रधान यांचे 'महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे' तसेच गोरे गौरव ग्रंथ त्याच्या समकालीनांनी त्यांच्यावर लिहिलेल्या लेखनाचा अभ्यास केला आहे.

**बालपण -**

ना. ग. गोरे यांच्या वडिलांचे नाव गणेशपंत ऊर्फ अण्णासाहेब गोरे हे कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील देवगड तालुक्यामधील हिंदळे या गावी रहात

होते. ना. ग. गोरे यांचे वडिल मुंबईला मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्यानंतर त्यांना शिक्षण खात्यात पुणे येथे नोकरी लागली. त्यांना दोन मुले, थोरली गंगुबाई आणि त्यांच्या पाठचे नारायण. ना. ग. गोरे यांचा जन्म १५ जून १९०७ रोजी झाला. त्यांना हिंदळे गावचा निसर्ग आवडत होता. वेळ मिळेल त्यावेळी त्याचा आस्वाद घेण्यास ते पुण्याहून गावी जात होते.

गोरे कुटुंब परंपरावादी होते. त्यामुळे घरात पूजाअर्चा होती. ना. ग. गोरे यांच्या वडिलांना अण्णा म्हणत असत. त्यांच्या वडिलांचा देवधर्माकडे विशेष कल होता. ना. ग. गोरे यांच्या घरातील वातावरण धार्मिक होते. त्यामुळे लहाणपणीच त्यांच्या मनात भक्तिभाव होता. १

ना. ग. गोरे यांच्या सभोवताली सामान्य कुटुंबातील लोक रहात होते. कारकून, भटभिक्षुकी करणारे छोटे उद्योग करून उदरनिर्वाह करून जगणारे लोक होते. त्यावेळी महिना पन्नास-साठ रूपये पगार मिळविणारे ना. ग. गोरेंचे वडिल सुस्थितीतले समजले जात होते. ना. ग. गोरेंना पूजा, वेद यांची आवड होती. घरातील वातावरणामुळे उपवास, पूजा, तपश्चर्या इ. परंपरागत आचार विचार त्यांना आवडत असे. त्याकाळी समाजात अंधश्रध्देवर मोठ्या प्रमाणावर विश्वास ठेवणारे लोक होते.

घराच्या सुरक्षित भिंतीमध्ये ना. ग. गोरेंचे बालमन रमले होते. आजूबाजूची सामाजिक परिस्थिती, पारतंत्र्य याबाबतीत विचार करण्याएवढे त्यांचे मन प्रगल्भ झाले नव्हते. प्रारंभी कुटुंबातील इतरांप्रमाणेच ना. ग. गोरे हे 'सत्यशोधक समाजाचे' कडवे विरोधक होते. २ नंतर ज्ञानाच्या कक्षा विकसित झाल्या तशी ना. ग. गोरेंची दृष्टी ही बदलत गेली. पूर्वापार चालत आलेल्या रूढी, कर्मकांड याबद्दल

त्यांच्या मनात तिटकारा उत्पन्न होऊ लागला अर्थात हा बदल हळूहळू होत होता. लहान वयामध्ये या गोष्टींविरूध्द बंड करण्याएवढी प्रगल्भता नव्हती. तसेच वडिल माणसांचा धाकही होता. पण हळूहळू या मनस्थितीमध्ये फरक पडू लागला. शिक्षणाबरोबरच विचारांनाही चालना मिळत गेली. आणि परंपरेने चालत आलेल्या विचारांना बुध्दीच्या कसोटीवर घासून पाहिलेच पाहिजे एवढी धिटाई त्यांच्या मनामध्ये येऊ लागली. ३

ना. ग. गोरे यांच्या घरातील वातावरण त्याकाळच्या सर्वसाधारण सुखवस्तू ब्राम्हण कुटुंबात असावयाचे तसेच होते. मुंज झाल्यावर संध्या, पूजापाठ हेही ना. ग. गोरेंनी केले होते. घराण्याच्या उपाध्यायांकडून पुरूषसुक्त, रूद्र यांचे पाठ घेतले. रोज संध्याकाळी देवदर्शनाला जाणे गीतेचा अध्याय म्हणणे या सर्व गोष्टी त्या काळच्या ब्राम्हण कुटूंबात होत असत. ना. ग. गोरेंचे घरही त्याला अपवाद नव्हते.

ना. ग. गोरेंचे बालपण अशा वातावरणात गेले की तेथे लहानपणी रूढी, परंपरा, सणवार, नवस या गोष्टी होतच असत त्यांना सामाजिक मान्यता होती. घरातही कर्मठपणे या सर्व गोष्टी पाळल्या जात. परंतु कळायला लागल्यावर वाचनातून, अभ्यासातून या गोष्टींचा फोलपणा त्यांच्या लक्षात आला. ना. ग. गोरे यांचे 'भाल' हे आवडते दैनिक होते. ४ सर्वसामान्य माणसांना पारंपारिक तत्त्वांच्या, ग्रंथांच्या अथवा संस्काराच्या पकडीतून सुटणे कठीण होते. कारण ही तत्त्वे, प्रथा, संस्कार स्वभावतही मुरून गेलेली असतात. आणि त्यांना दूर करायचे तर स्वत:मधील एक भाग दूर करावा लागतो. हा झगडा स्वत:चा स्वत:शीच असतो. त्यात पराकाष्ठेच्या यातना असतात. आपल्याच माणसांना दुरावण्याचे दु:खही पदरी येऊ शकते. परंतु ना. ग. गोरे यांनी कठोरपणे या गोष्टी केल्या आहेत.

**शिक्षण :**

ना. ग. गोरेंचे शिक्षण प्रथम सदाशिव पेठेतील ट्रेनिंग कॉलेजच्या आवारातील सरकारी प्राथमिक शाळेत झाले. ना. ग. गोरेंचे चौथीपर्यंतचे शिक्षण इंग्रजीमधून 'पूना हायस्कूल' मध्ये झाले. चौथी पास झाल्यावर ते शनिवार पेठेतील रमण बागेतील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये जाऊ लागले. ना. ग. गोरेंच्या जीवनप्रवाहातले ते पहिले दिशान्तर होते. ५

ना. ग. गोरेंनी १९२२ सालापर्यंत अभ्यास आणि अवांतर वाचन भरपूर केले. शालेय जीवनात ते हुशार विद्यार्थी म्हणून गणले जात. ना. ग. गोरेंनी १९२२ साली न्यू इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घेतला. याच शाळेमध्ये त्यांना एस.एम. जोशी, गोपीनाथ तळवळकर, र. के.खाडिलकर यांच्यासारखे मित्र लाभले. ना. ग. गोरे खूप वाचन करत त्यामुळे त्यांची शब्दयोजना अचूक असे. एक शब्द कोठेही वायफळ जायचा नाही. ते खेळ देखील उत्कृष्ट खेळत. खो-खो, हुतूतू उत्तम खेळत. ६

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ना. ग. गोरेंच्या विचारांना एक निश्चित दिशा मिळाली. ना. ग. गोरे यांच्या आचारविचारांना या शाळेमध्ये पोषक वातावरण लाभले. एस. एम. जोशी, र. के. खाडीलकर, गोपीनाथ तळवलकर या मित्रांच्या सहवासात त्यांनी ज्योतिबा फुले, मार्क्स, आगरकर इ. विचारवंतांचे साहित्य वाचले. भारतीय पारंपारिक विचारांमधील आणि समाजव्यवस्थेमधील गुणदोषांचे ज्ञान त्यांना झाले. ब्रिटिश साम्राज्यशाहीचे स्वरूप, भारतातील वर्ण व जातिव्यवस्था इत्यादिविषयी माहिती मिळाली. ७

ना. ग. गोरेंच्या घरचे वातावरण परंपरावादी होते. परंतु ना. ग. गोरे यांचे वाचन वाढले त्यामुळे त्यांच्या बुध्दीला प्रगल्भता आली. ना. ग. गोरे शिकत

असलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये अतिशय कडक शिस्त होती. तेथील शिस्तशीर वातावरणामुळे ना. ग. गोरे यांना अभ्यास करण्याची सवय लागली अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचन करण्याची आवड त्यांच्या मनात निर्माण झाली. लोकमान्य टिळक मंडालेहून सुटून आले त्यावेळी लोकमान्यांचे दर्शन घेण्यासाठी एस. एम. जोशी, शिरूभाऊ लिमये, खाडिलकर आदि मित्रांसोबत ना. ग. गोरे ही गायकवाडवाड्यात गेले होते. ना. ग. गोरे यांचे वडिल अण्णा सरकारी नोकरीत होते. तरीसुध्दा त्यांना लोकमान्यांबद्दल मोठा आदर वाटे. त्यांचा संस्कार ना. ग. गोरे यांच्या मनावर झाला. संस्कृत, मराठी आणि इंग्रजी हे ना. ग. गोरेंच्या आवडीचे विषय होते. साहित्य वाचताना मानवी स्वभावातील विविधता समजू लागली. मॅट्रिकच्या परिक्षेत चांगले यश मिळविल्यानंतर ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, शिखरे, तारकुंडे या मित्रांनी १९२५ साली फर्ग्युसन कॉलेजमधे प्रवेश घेतला. फर्ग्युसन कॉलेजचे ग्रंथालय मोठे होते. त्यामुळे त्यांच्या वाचनात आणखीनच भर पडली. त्यांच्या समवयस्क मित्रांमधे सतत वादविवाद होत. ना. ग. गोरे सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटूंबात वाढल्यामुळे त्यांना परिस्थितीची झळ कधीही लागली नव्हती. परंतु ते आत्मकेंद्रित नव्हते. एस. एम. कडून त्यांच्या गावात झालेल्या विधवेच्या विटंबनेची कहाणी ऐकून त्यांचे मन दुःखी झाले. आणि हे का? असा विचार ते करू लागले ना. ग. गोरे यांचे मन अधिक विचारप्रवण होते. त्यांना कृतिशील जीवनाबद्दल ओढ होती.

कॉलेजमध्ये गेल्यानंतर ना. ग. गोरेंनी जे ग्रंथ वाचले, जे विचार ऐकले, समवयस्क मित्रांशी ज्या चर्चा केल्या त्यामुळे त्यांचे मन विचारप्रवण बनले. पारतंत्र्यामुळे समाजात निर्माण झालेली जी लाचारी सभोवताली दिसत असे, त्याची त्यांना चीड येई. स्वाभिमानाने जगण्यात सौंदर्य आहे आणि गुलामगिरीत कुरूपता आहे असे त्यांना तीव्रतेने वाटे. रूढींच्यामुळे समाजजीवन आणि व्यक्तिजीवनही

खुरटले आहे. हा आगरकरांचा विचार ना. ग. गोरेंना मनोमन पटला. पारतंत्र्याच्या बेड्या आणि सामाजिक रूढींचे पाश तोडणे आवश्यक आहे, हे विचार ना. ग. गोरेंच्या मनात दृढ होत चालले बंडखोर विचार मनात येऊ लागले आणि ध्येयाने ते प्रेरित होऊ लागले. ८

लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रवादी व स्वराज्याच्या मंत्राने ते भारावले होते. म. गांधींचा संदेश सतत कानावर येऊ लागला. क्रांतिकारकांच्या समर्पित साहसी जीवनातील पराक्रमाच्या भव्यतेमुळे मन मोहून गेले. ध्येयासक्त जीवन जगण्याचा निर्धार होऊ लागला. जुन्या वळणाच्या ब्राम्हण कुटुंबातील एकुलत्या एका मुलाला ही झेप घेणे सोपे नव्हते. आईवडिलांना आपल्या वागण्याने दु:ख होईल, हा विचार ना. ग. गोरेंच्या मनाला अस्वस्थ करीत होता. चौफेर वाचन आणि भरपूर अभ्यास करत असल्यामुळे ना. ग. गोरेंची वैचारिक भूमिका स्पष्ट होत चालली होती.

ना. ग. गोरे इंटरमिजिएट आर्ट्स पास झाल्यावर बी. ए. ला इंग्लिश(ऑनर्स) व संस्कृत हे विषय घेतले. ना. ग. गोरेंना पहिल्यापासून साहित्याची आवड होती. त्यांच्या मते बी.ए. ला आल्यावर स्वतंत्र बुध्दीने अभ्यास केला पाहिजे. ना. ग. गोरेंनी बी.ए. साठी इंग्रजी हा विषय घेतल्यावर त्यांनी इंग्रजी साहित्यही मनसोक्त वाचले. शेक्सपिअरची नाटके, शेले, बायरन, कीट्स आणि ब्राऊनिंग यांचे काव्य तसेच रस्किन आणि कार्लाइल यांचे विचारप्रधान गद्य यांचे वाचन करताना त्यांना जीवनाचे एक आगळेच दर्शन झाले. डिस्कनच्या कादंबऱ्यातील गरिबांच्या शोषणांच्या, वेदनांच्या चित्रणाचाही ना. ग. गोरेंच्या मनावर खूप परिणाम झाला. परंतु सर्वांत त्यांच्यावर अधिक प्रभाव पडला तो मराठीतील आगरकरांच्या निबंधाचा आगरकरांचे 'सुधारक' मधील लेख वाचताना ना. ग. गोरेंना आपल्या समाजातील दोषांची तीव्र जाणीव होऊ लागली. परंपरावादी ब्राम्हण कुटुंबात संस्कारक्षम वयात झालेल्या

संस्कारांमुळे पूर्वी ज्या गोष्टी त्यांच्या मनाला फारशा बोचत नव्हत्या, त्या आता असह्य वाटू लागल्या. त्यावेळी ब्राम्हण कुटुंबात केशवपन केलेल्या अनेक पोक्त वयाच्या विधवा स्त्रिया ना. ग. गोरेंच्या अवतीभवती वावरत असत. त्यांच्या दु:खाची, केशवपनामुळे झालेल्या विटंबनेची, घरादारात त्यांची होत असलेली उपेक्षा याची जाणीव झाल्यावर ना. ग. गोरेंचे मन या रूढीविरूध्द बंड करून उठू लागले. पुण्यात आणि त्यापेक्षाही त्यांच्या गावाला हिंदळ्याला दलितांना अस्पृश्य म्हणून कसे वागविले जाई, हे त्यांनी पाहिले होते. ही जन्माधिष्ठित विषमता नष्ट झाली पाहिजे असे त्यांना वाटे.

ना. ग. गोरे यांच्या मते, समाज सुधारल्याशिवाय स्वराज्याची चळवळ आपण एकजुटीने करू शकणार नाही आणि आपण परक्यांच्या गुलामगिरीमुळे स्वत:च्या दोषांकडे डोळेझाक करतो. खेड्यातील दारिद्र्य फारच भीषण होते. या सगळ्या अघाड्यांवर लढावे लागणार आहे असे गोरेंना वाटत होते. ९

फर्ग्युसन कॉलेजमध्ये असताना पाश्चात्य विचारवंतानी जीवनातील निरनिराळ्या समस्यांवर केलेले भाष्य वाचून भारतीय परिस्थितीच्या संदर्भातही नवीन विचार केला पाहिजे असे त्यांना वाटे. कॉलेजमध्ये विद्यार्जन करीत असताना त्यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेतला नाही. परंतु आपल्या भावी राजकीय जीवनाची वैचारिक साधनसामुग्री त्यांनी विद्यार्थी जीवनात संचित केली.

### भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग

१९२२ साली ना. ग. गोरेंनी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घेतला आणि येथपासूनच नवीन अशा विचारप्रवाहाकडे त्यांचा प्रवास सुरू झाला. टिळक-आगरकर-चिपळूणकर यांनी स्थापन केलेल्या या संस्थेमध्ये विद्यार्थ्यांमधील

स्वदेशाभिमान जागृत करून आस्थेने, तळमळीने शिकविणारे शिक्षक होते. देशात घडत असणाऱ्या राजकीय सामाजिक स्थित्यंतराची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात येत असे. १९२० साली लोकमान्य टिळकांचे देहावसान झाले.महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली १९२० सालचा पहिला देशव्यापी लढा झाला. संपूर्ण देशामध्ये स्वातंत्र्य चळवळीचे वादळी वारे वाहू लागले. ना. ग. गोरेंच्या संवेदनशील मनाला स्वातंत्र्याचे वेध लागले.

१९२७ मध्ये मुंबईमध्ये 'यूथ लीग' स्थापन झाली. यूथ कॉन्फरन्सचे अध्यक्ष वीर नरिमन होते. लाहोरमध्ये सायमन कमिशनविरूद्ध निदर्शने करताना लाला लजपतराय यांच्यावर सँडहर्स्ट या अधिकाऱ्याने लाठीहल्ला केला. यामध्ये लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. या घटनेचा निषेध 'यूथ लीग' तर्फे पुण्यात केला. पुण्याच्या 'यूथ लीग' मध्ये एस. एम. जोशी, खाडिलकर, ना. ग. गोरे इ. सामिल झाले होते. याच चळवळीत असताना ना. ग. गोरे यांची गाठ युसूफ मेहेरअलींशी पडली. दोघांची मैत्री झाली. या दोघांमध्ये विविध विषयांवर चर्चा होत असे. स्वातंत्र्यचळवळ हा मुख्य विषय असला तरी धर्मभेद, जातिभेद यातून निर्माण झालेला संकुचितपणा दूर झाला पाहिजे, आर्थिक विषमता आणि पिळवणूक नष्ट झाली पाहिजे या विचारांनाही चालना मिळत गेली. १०

१९२० साली गांधीजींनी असहकाराची चळवळ केली. गोरेंच्या मते ती चळवळ गांधीजींनी मागे घ्यायला नको होती, त्यामुळे लोकांचा उत्साह कमी झाला. ना. ग. गोरे आणि एस. एम. यांच्यामध्ये स्वातंत्र्यचळवळीसंबंधी सतत चर्चा होत होती. ना. ग. गोरेंच्या मते, स्वातंत्र्यचळवळीत सहभागी होणाऱ्या तरूणांची संघटना केली पाहिजे आणि त्याप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीच्या कामाला त्यांनी सुरूवात केली.

१९०८ सालच्या खटल्यात कोर्टात टिळकांनी केलेले भाषण त्यांनी वाचले. आपल्याला स्वस्थ बसून चालणार नाही असे त्यांना वाटले. टिळकांनी त्यांच्यापुढे देशभक्तीचा आदर्श ठेवला होता. त्यांना क्रांतिकारकांबद्दल विलक्षण आकर्षण होते. एस. एम., ना. ग. गोरे, खाडिलकर, शिरूभाऊ लिमये हे मित्र नेहमी भेटत चर्चा करीत. स्वातंत्र्यासाठी चळवळ केली पाहिजे, आपण मातृभूमीची सेवा केली पाहिजे, असे या चारही मित्रांना तीव्रतेने वाटे. ना. ग. गोरे, जोशी आणि खाडिलकर हे तिघेही तरूण ब्राम्हण कुटुंबातले शहरात राहणारे असले तरी त्यांचे विचार हे सर्वच बाबतीत पुरोगामी होते. ११

ना. ग. गोरेंना आगरकरांच्या सुधारणावादी विचारांबद्दल आकर्षण होते, त्याचप्रमाणे तर्कसुसंगत विवेचनाचा, समाजातील दोषावर त्यांनी केलेल्या प्रहाराचा खूप मोठा परिणाम त्यांच्यावर होता. त्याप्रमाणे लोकमान्य टिळकांच्या कृतिशील जीवनाबद्दलही आकर्षण वाटे. लोकमान्य टिळक हे जहालवादी होते. ते आपली स्वराज्याची मागणी योग्य आहे, न्याय्य आहे हे जगापुढे मांडित होते तसेच भारतीयांना स्वराज्यासाठी चळवळ करण्याची प्रेरणा देत होते. त्यांना आधी स्वराज्य मिळवायचे होते. त्यांच्या मते आधी राजकीय सत्ता ब्रिटीशांकडून हस्तगत करायची व नंतर समाज सुधारण्यासाठी प्रयत्न करायचे. आगरकरांचे टिळकांच्या विरोधी धोरण होते. आगरकरांच्या मते, सामाजिक सुधारणा या आधी व्हायला हव्यात. त्यांच्या मते समाजातील दोष आधी नष्ट झाले पाहिजेत. रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यातून लोक बाहेर पडतील तेव्हा ते एकजुटीने स्वातंत्रचळवळ लढू शकतील. टिळक आणि आगरकर या दोघांमध्ये आधी राजकीय की सामाजिक असा वाद होत असे. ते दोघे पुढे आपापल्या मार्गाने गेले. ना. ग. गोरेंच्या मनावर दोघांच्याही विचारांचा प्रभाव पडला. त्यांच्या मते, आपल्याला स्वराज्यासाठी

चळवळ करतानाच समाजही सुधारला पाहिजे. लोकमान्य टिळकांची जहाल राष्ट्रवादी आणि आगरकरांची समाज सुधारणावादी भूमिका या दोन्ही प्रवृत्ती एकत्र असल्या पाहिजेत असे ना. ग. गोरे यांना वाटत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी तीच भूमिका घेतल्यामुळे जोशी, गोरे, खाडिलकर यांच्या विचारांना अधिक सुस्पष्टता आली व सामर्थ्य लाभले. अशा व्यापक वैचारिक भूमिकेवरूनच 'यूथ लीग' ची महाराष्ट्रात स्थापना करण्याचा निर्णय या तीन ध्येयवादी तरूणांनी घेतला.

'यूथ लीग' च्या स्थापनेनंतर जोशी, ना. ग. गोरे आणि खाडिलकर हे तीन तरूण चळवळे म्हणून पुणेकरांना परिचित झाले. 'यूथ लीग' मुळे जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांच्या संपर्कात हे तीन तरूण कार्यकर्ते आले. या दोघानांही महाराष्ट्रातील या उदयोन्मुख नेत्यांबद्दल आपुलकी वाटली व त्यांच्याबद्दल अपेक्षाही निर्माण झाल्या. १२

युसूफ मेहरअली ह्यांनी सुरू केलेल्या यूथ लीगमध्ये ना. ग. गोरे, एस.एम. जोशी, सहभागी झाले. एका अर्थाने आपल्या राजकीय जीवनाचा पाया त्यांनी ह्या युवक आंदोलनाद्वारे उभारला. १९३० साली गांधीजींनी आपण स्वराज्यासाठी देशव्यापी लढा सुरू करणार असल्याचे जाहीर केले. गोरे, जोशी, खाडिलकर या 'यूथ लीग' च्या कार्यकर्त्यांनी आगामी लढ्यामध्ये भाग घेण्याचा निर्धार केला. गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह करून इंग्रजांच्या राजवटीविरूध्द मोर्चे बंदी उभारण्याचे ठरविले. श्रीमंतांच्या महालापासून ते गरीबांच्या खोपटांपर्यंत सर्वांना साधणारा दुवा म्हणजे मीट त्या मिठावर परकीय इंग्रज राजवटीने लादलेला कर म्हणजे अन्यायाचे प्रतीक त्या प्रतीकाविरूध्दचा सत्याग्रह म्हणजे राष्ट्रीय अस्मितेचे दर्शन मानून गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. ना. ग. गोरेंना गांधीजींचा तर्क पटला आणि त्यांनी मिठाच्या सत्याग्रहात सामील होण्याचे ठरविले. गांधीजींनी जाहीर केले

की ते त्यांच्या काही अनुयायांसमवेत साबरमती आश्रमातून निघून दांडी या समुद्रकिनाऱ्यावरील गावापर्यंत जातील आणि समुद्रकिनारी मिठावरील कराच्या कायद्याचा भंग करून मीठ गोळा करतील. दांडीयात्रेला जगभर प्रसिध्दी मिळाली. गोरे, जोशी आणि खाडिलकर या तिघांनीही या सत्याग्रहात भाग घेऊन कायदेभंग करण्याचा निर्णय घेतला. ना. ग. गोरे आणि खाडिलकर यांनी ठाणे जिल्ह्यामध्ये सरकारविरोधी भाषणे केली आणि त्यांना लागलीच अटक झाली. मॅजिस्ट्रेटने या दोघांनाही चार महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली आणि 'क' वर्ग दिला. राजकीय संघर्षातील ना. ग. गोरेंचा हा पहिला पाठ होता. त्यांच्या मनाची पूर्ण तयारी असल्यामुळे त्यांनी कारावासातील सर्व हाल आनंदाने सोसले. शिक्षा भोगून ना. ग. गोरे बाहेर आले. स्वातंत्र्यासाठी अशा शिक्षा भोगाव्या लागणारच, याची त्यांना जाणीव होती. १३

१९१९ च्या मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानंतर पुढील राजकीय सुधारणांचे स्वरूप काय असावे हे ठरविण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने सायमन कमिशन नियुक्त केले. देशाच्या नेत्यांची स्वाभाविक अपेक्षा ही होती की, भारतातील राजकीय सुधारणांचा मसुदा करताना एक तरी भारतीय नेता सायमन कमिशनचा सदस्य असावा. परंतु ब्रिटीश साम्राज्यवाद्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या कमिशनमध्ये एकही भारतीय सदस्य नव्हता. याची संतप्त प्रतिक्रिया भारताच्या राजकीय जीवनात उमटली आणि कॉंग्रेसने सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचे ठरविले. सायमन कमिशनच्या विरोधात प्रचंड निदर्शने झाली. सर्व ठिकाणी निदर्शकांवर जबरदस्त लाठीमार करण्यात आला. परंतु निदर्शक हटले नाहीत. 'यूथ लीग' चे ना. ग. गोरे, खाडीलकर, जोशी आदी पुण्यातील कार्यकर्ते सायमन आयोगाविरूध्द घोषणा देण्यासाठी खंडाळ्याच्या घाटात गेले. तेथे त्यांना पकडण्यात आले. परंतु सायमन

यांची गाडी गेल्यानंतर त्यांना लगेच सोडून देण्यात आले.

३१ डिसेंबर १९२९ ला पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन लाहोर येथे भरले. या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्य हे भारताचे ध्येय आहे, हे जाहीर करणारा ठराव एकमताने पास झाला आणि आगामी २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करावा असे पंडित नेहरूंनी आवाहन केले. त्याप्रमाणे पोलीस, दडपशाहीस न जुमानता झेंडावंदन आणि सभा हे कार्यक्रम देशभर साजरे झाले. पुणे आणि पुणे जिल्ह्यात तरूणांना या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यासाठी जोशी, ना. ग. गोरे, खाडीलकर, शिरू लिमये आदींनी खूप प्रयत्न केले आणि त्यामुळे हे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले.१४

कारावासातून सुटल्यावर ना. ग. गोरेंनी व एस. एम. जोशी यांनी एम. ए. ला फर्ग्युसन कॉलेजमध्ये नाव घातले. २२ जुलै १९३१ ला फर्ग्युसन कॉलेजला गव्हर्नर व्हॉटसन यांनी भेट दिली असताना वासुदेव बळवंत गोगटे या तरूणाने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. परंतु हॉटसन बचावला आणि गोगट्यांना पकडण्यात आले. यानंतर कोणताही पुरावा नसताना फर्ग्युसन कॉलेजमधून एस. एम. जोशी आणि ना. ग. गोरे यांना काढून टाकण्यात आले. त्यामुळे या दोघांनी लॉ कॉलेजमध्ये नाव घातले.

२२ ते २४ डिसेंबर १९३१ ला एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर या 'यूथ लीग' च्या कार्यकर्त्यांनी पुण्यामध्ये परिषद आयोजित केली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी सुभाषचंद्र बोस हे होते. या परिषदेत तरूणांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. मुंबई प्रांतात अटक झालेल्यांना प्रथम दोन महिने स्थानबध्द करण्यात आले. १५

१९३२ मध्ये ना. ग. गोरे, एस. एम. जोशी आणि रघुनाथ खाडिलकर यांना येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्यात आले. तेथून सुटताच ना. ग. गोरेंनी एका नव्या संघर्षाची सिध्दता केली. १९३२ साली काँग्रेसच्या नेतृत्वाने सरकारी हुकूम मोडून दिल्ली येथे काँग्रेसचे बेकायदेशीर अधिवेशन भरविण्याचे ठरविले. बाहेरच्या प्रांतातून येणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाच्या प्रतिनिधींना आदेश देण्यात आले की, त्यांनी दिल्लीत येताच तडक अधिवेशनाच्या स्थळी जावे. आणि कायदेभंग करावा. दिल्लीचे गुप्त पोलीस स्टेशनच्या क्षेत्रात तैनात झाले. त्यांनी राजकीय कार्यकर्त्यांची तुरूंगात रवानगी केली. तेथे ना. ग. गोरेंना अटक करण्यात आली. त्यांना नंतर दोन वर्षाची सजा देण्यात आली. तेथून त्यांना प्रथम येरवड्याच्या आणि नंतर नाशिकच्या तुरूंगात पाठविण्यात आले. ना. ग. गोरेंचे नाशिकच्या तुरूंगातील वास्तव्य हे ऐतिहासिक ठरले. कारण ह्याच कारागृहात जयप्रकाश नारायण, एस. एम., मिनू, मसानी, अशोक मेहता आदींच्या सहवासात समाजवादी विचारांकडे ते आकृष्ट झाले.

काँग्रेस सोशालिस्ट पार्टी काढण्यामागे एक प्रेरणा होती, ती म्हणजे, ''गांधीजींच्या केवळ रचनात्मक कामामुळे या देशात पुरेशी शक्ती निर्माण होणार नाही. ती निर्माण करावयाची असेल तर शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या संघर्षशील संघटना बांधल्या पाहिजेत. कामगार आणि भांडवलदार यांच्यामधील विरोध लक्षात घेऊन श्रमजीवींची संघटना केली पाहिजे ती केल्याशिवाय राष्ट्रवादाची चळवळ प्रभावी होऊ शकत नाही'' हे सूत्र घेऊन या सर्व नेत्यांनी काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन केला. ना. ग. गोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे प्रमुख उद्दिष्ट स्वातंत्र्य मिळविणे हे होते. ते गाठण्यासाठी समाजवादाचा उपयोग होईल म्हणून ते समाजवादी झाले. जनतेत स्वातंत्र्याविषयी जागृती निर्माण करून त्यांना एका झेंड्याखाली आणणे हा समाजवादी विचार होता. म्हणून ना. ग. गोरेंनी समाजवादाचा स्वीकार

केला. समाजवाद्यांचे लोकशाही मार्गांनीच समाज परिवर्तन व सत्तापरिवर्तन घडवून आणण्याचे सतत प्रयत्न राहिले. १७

ना. ग. गोरे यांची राजकीय क्षेत्रात अशी झपाट्याने वाटचाल चालू असतानाच त्यांनी कौटुंबिक जीवनालाही कलाटणी दिली. गोरे 'यूथ लीग' मध्ये काम करू लागल्यावर त्यांच्या वडिलांना पहिला धक्का बसला. ना. ग. गोरे यांनी त्यांच्या देशभक्तीपर विचारानुसार १९३२ साली स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन कारावास पत्करला. सरकारी नोकरीत आयुष्य घालविलेल्या त्यांच्या वडिलांना हे पसंत नव्हते. परंतु ते विरोधही करू शकत नव्हते. राजकीय विचारांप्रमाणेच सामाजिक बाबतीतही ना. ग. गोरेंचे विचार पुरोगामी आणि प्रखर सुधारणावादी होते. आगरकरांप्रमाणेच बुध्दिप्रामाण्यवादी भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्टपणे आपल्या वडिलांना सांगितले. ना. ग. गोरे आणि सुमतीबाई कीर्तने यांची कॉलेजमध्ये ओळख झाली. त्यावेळी सुमतीबाई विधवा होत्या. या ओळखीचे रूपांतर प्रेमात होऊन ना. ग. गोरे आणि सुमतीबाई यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला हे ना. ग. गोरेंनी ज्यावेळी आई-वडिलांना सांगितले, त्यावेळी त्या दोघांना मोठा धक्काच बसला. ना. ग. गोरेंचे वडिल सनातनी विचारांचे असल्यामुळे एकुलत्या एका मुलावर उत्कट माया असूनही त्यांनी या विवाहाला संमती देण्यास स्पष्ट नकार दिला. ना. ग. गोरेंनी पूर्ण विचारपूर्वक पुनर्विवाह करण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे आईवडिलांना दुखावताना वाईट वाटत असूनही ना. ग. गोरे व सुमतीबाई हे १९३४ साली विवाहबध्द झाले. सुमतीबाई या बी. ए. होत्या. त्या प्रथम आगरकर हायस्कूलमध्ये आणि नंतर सेवासदनमध्ये शिक्षिका म्हणून काम करु लागल्या. ना.ग. गोरे सर्ववेळ समाजवादी पक्षाचे काम करीत असल्यामुळे संसाराची आर्थिक जबाबदारी सुमतीबाईंनीच स्वीकारली. १८

नाशिकच्या तुरूंगात सजा भोगत असताना कार्ल मार्क्सचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' वाचल्यावर ना. ग. गोरे यांची विचारप्रक्रियाच बदलून गेली. तो ग्रंथ ना. ग. गोरेंच्या दृष्टीने निर्जीव प्रबंध नसून झंझावात होता. गोरेंच्या मते, ''मार्क्सने त्यांना मार्क्सवादी बनविले नाही. पण बुध्दिवादी बनविले''. ना. ग. गोरेंची भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व आध्यात्मिक विचार करण्याची जी काही परंपरा होती ती पूर्णपणे मार्क्सच्या विचारांमुळे बदलून गेली आणि कोणत्याही घटनेकडे, धर्माकडे, तत्वज्ञानाकडे अथवा समाजाकडे चिकित्सक दृष्टिकोणातून कसे पहावे हे मार्क्सच्या ग्रंथामुळे ते शिकले. येरवडयाच्या तुरूंगामुळे परंपरेची चाकोरी फोडून बाहेर येण्यासाठी त्यांना आवश्यक असे शारीरिक सामर्थ्य लाभले आणि मार्क्सच्या विचाराने मानसिक तयारी झाली.

कम्युनिस्ट जाहीरनाम्यामध्ये मार्क्सने मानवता वादावर भर दिला, कामगार वर्गाची हुकूमशाही प्रथम झाली पाहिजे कारण जगातील इतिहासात कामगार वर्गाचे स्थान महत्त्वाचे आहे, या विचाराचा पाठपुरावा केला. कामगार वर्गाचे वर्चस्व स्थापन झाले की, शोषणरहित समाजव्यवस्था निर्माण होईल, प्रत्येकाच्या विकासाला वाव राहील, सरकारी शाळांमधून सर्व मुलांना मोफत शिक्षण द्यावे, लहान मुलांना कारखान्यात राबवून घेऊ नये, असे अनेक उपक्रम या मॅनिफेस्टो मध्ये होते. या जाहीरनाम्यामुळे कम्युनिस्ट कार्याला निश्चित दिशा मिळाली, नवी क्षितिजे खुली झाली, कामगार चळवळ जागतिक पातळीवर नेणे आणि त्या चळवळीला शास्त्रीय अधिष्ठान देणे ही फार मोठी झेप या जाहीरनाम्याने घेतली. मार्क्सच्या या सर्व विचारांचा प्रभाव ना.ग. गोरेंवर पडला. ना. ग. गोरेंनी काही वर्षे मार्क्सवादाचा पूर्णपणे स्वीकारही केला. याच दरम्यान गळ्यातील यज्ञोपवीत त्यांनी काढून टाकले आणि विधवेशी विवाह करण्याचा निश्चय केला. एका दृष्टीने जुन्याचे जोखड

खांद्यावरून उतरवून नवीन विचारांना आपलेसे केले. परंतु हळूहळू मार्क्सवादामधील त्रुटीही ना. ग. गोरेंच्या लक्षात येऊ लागल्या. सत्तारूढ होण्यापूर्वीचा मार्क्सवाद आणि सत्तारूढ झाल्यानंतरचा मार्क्सवाद यातील तफावत जाणवू लागली. कामगारांच्या हांती सत्ता आली की सर्व मंगलमय होईल हे फक्त स्वप्नच ठरले. यामुळे इतर कट्टर मार्क्सवादी मार्क्सवादापासून दूर झाले तसेच ना. ग. गोरेही याबाबतीत अधिक सतर्क झाले. त्यांनी मार्क्सवादी विचार चिकित्सक पध्दतीने स्विकारले.

महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव ना. ग. गोरेंवर पडला. महात्मा गांधीनी व्यक्ती-माणूस याला केंद्रस्थानी मानले. क्रांतीची सुरूवात स्वत:पासून झाली पाहिजे हा गांधीजींचा विचार ना. ग. गोरेंना अर्थपूर्ण वाटला. ''विचार आणि आचार यात शक्य तेवढी एकवाक्यता असली पाहिजे'' हा गांधीविचारसरणीतील आग्रह ना. ग. गोरेंना फार महत्त्वाचा वाटतो. ना. ग. गोरेंवर मार्क्स व गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला. परंतु त्यांनी या दोघांच्याही विचारातील सार तेच उचलले.

ना. ग. गोरेंना मार्क्सचे व गांधीजींचे विचार मोलाचे वाटतात. परंतु ते मार्क्सवादी ही झाले नाहीत आणि गांधीवादीही झाले नाहीत. त्यांच्या मते, ''विचारशील व्यक्ती ही कोणत्याच वादामध्ये बंदिस्त होऊ शकत नाही''. कामगारवर्गाचे अधिपत्य स्थापन झाल्यानंतर त्यांच्याकडून अन्याय होणारच नाही ही मार्क्सची कल्पना ना. ग. गोरेंना पटत नाही. त्यांच्या मते यातील मुख्य दोष म्हणजे, ती अधिसत्ता जुलूम करू लागली तर तिला विरोध करण्याचे सामर्थ्य जनतेने कोठून आणावे ते मार्क्सने सांगितलेलेच नाही. या बाबतीत गोरेंना गांधीची भूमिका अधिक तर्कशुध्द वाटली. राजदंड कोणाच्याही हाती असो, त्याचा गैरवापर

सत्ताधाऱ्यांकडून घडणे शक्य आहे, हे गांधीजींनी मान्य केले होते, आणि त्यांच्या कल्पनेतील राज्यव्यवस्थेत पण न्यायप्रिय व्यक्तीला सत्याला अग्रहक्क देण्याचे आणि सत्यासाठी खुद्द शासनाशी झगडण्याचा हक्क देण्याचे त्यांनी मान्य केले होते. हे गांधीजींचे विचार ना. ग. गोरेंना पटतात.

ना. ग. गोरेंनी मार्क्स व गांधीजी यांच्या विचारातील सार ग्रहण केले आणि आपली वाटचाल चालू ठेवली. 'हिंदस्वराज्य' या ग्रंथामध्ये गांधीजींनी जे विचार मांडले, त्यातले यंत्र व तंत्र आणि दंड यांच्यासंबंधीचे त्यांचे विचार गोरेंना मान्य होऊ शकले नाहीत. शोषणविरहीत आणि दंडविरहीत समाजाची ते कल्पना करतात हे गोरेंना मान्य होते. ना. ग. गोरेंच्या मते, मानव एकविसाव्या असो की बाविसाव्या शतकातील असो, मानवाला मार्क्सचा आणि गांधीजींचा समन्वय साधून आपली प्रगती करावी लागेल. गांधीजींना सांगितलेली अहिंसा, समता, करूणा ही मूल्ये गोरेंना आवश्यक वाटतात. गोरेंना गांधीजींची विश्वस्त कल्पना पटते. वैयक्तिक सुखोपभोगांना मर्यादा घातली पाहिजे हा त्यांचा विचार ना. ग. गोरेंना प्रेरक वाटतो. समाजविकासाची अंतिम स्थिती म्हणजे दंडहीन समाज हे मार्क्स व गांधीजी या दोघांचेही अंतिम ईप्सित आहे. पण ना. ग. गोरेंच्या मते, दंडहीन समाजाची कल्पना कधीही प्रत्यक्षात येणार नाही. १९

ना. ग. गोरेंना १९३२ मध्ये जो कारावास झाला तो त्यांच्या पहिल्या कारावासापेक्षा कमी खडतर होता. सक्त मजुरीची शिक्षा नसल्यामुळे वाचन करायला भरपूर फुरसद होती. नाशिकच्या तुरूंगात जयप्रकाश नारायण, युसूफ मेहरअली, अच्युतराव पटवर्धन आदींच्या बरोबर ना. ग. गोरे होते. ना. ग. गोरेंनी मार्क्सचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' हा ग्रंथ वाचला, तसेच एंगल्सचे 'युरोपियन ॲण्ड सायंटिफिक सोशालिझम' आणि मार्क्स, लेनिन यांचे अन्य साहित्यही वाचले. तुरूंगामध्ये ना.

ग. गोरे व त्यांच्या मित्रांमध्ये सतत चर्चा चालत. भारतातील स्वातंत्र्य चळवळीत समाजवादी आशय आणण्यासाठी जी संघटना उभी करावी लागेल आणि जे आंदोलन करावे लागले त्याची सर्व सूत्रे भारतीयांच्या हाती असली पाहिजेत. अशीच भूमिका नाशिक तुरूंगातील त्यांचे समविचारी सहकारी यांनी घेतली होती. २०

१९३० व १९३२ च्या स्वातंत्र्य चळवळीत जो कारावास ना. ग. गोरेंनी सोसला त्यामुळे त्यांचा ध्येयवाद अधिक कणखर झाला. १९३० साली येरवडाच्या तुरुंगात आणि विशेषतः १९३२ साली नाशिकच्या तुरुंगात मार्क्सचे ग्रंथ वाचले. मार्क्सच्या तर्कसंगत बुध्दिनिष्ठ विचारांचा त्यांच्या मनावर फार मोठा प्रभाव पडला. भारताची स्वातंत्र्यचळवळ ही केवळ ब्रिटीशविरोधी चळवळ नाही. स्वतंत्र्यलढ्यातून भारतीय समाजाला नवी दिशाही लाभली पाहिजे. धर्मभेद जातीभेद यातून निर्माण झालेला संकुचितपणा दूर झाला पाहिजे आणि सामाजिक-आर्थिक विषमता व पिळवणूक नष्ट झाली पाहिजे या समाजवादी विचारांबद्दल ना.ग. गोरे यांना आकर्षण वाटत होते. लोकशाहीच्या चौकटीत राहून आर्थिक शोषण नाहीसे करणे व समताधिष्ठित समाज निर्माण करणे, दारिद्रयाचे निर्मूलन करणे, लोकांचा कारभारात सहभाग, विकेंद्रीकरण ही समाजवादी चळवळीची उद्दिष्टे होती. समाजवादी चळवळीने कामगार शेतकरी आणि शेतमजूर महत्त्वाचे मानले होते. ना.ग. गोरेच्या मते या सर्वांना संघटित केले पाहिजे. समाजवादी चळवळींच्या या उद्दिष्टांमुळे ना.ग. गोरे हे समाजवादी बनले. ‘स्वातंत्र्य कुणासाठी?’ या प्रश्नाचे उत्तर त्यांना गवसले आणि स्वातंत्र्यलढ्याच्या मुख्य प्रवाहात राहतानाच समाजवादी विचारांचा आग्रह धरून तो विचार प्रत्यक्षात येण्यासाठी दीर्घकाळ काम केले पाहिजे, असा ना. ग. गोरेंच्या मनाचा निर्धार झाला. महाराष्ट्रातील तरूणांना समाजवादी विचार सांगण्यासाठी आणि स्वातंत्र्यसंग्रामात आणण्यासाठी ना.ग. गोरेंनी अनेक ठिकाणी दौरे केले,

कार्यकर्त्यांच्या शिबीरामध्ये आणि अभ्यासवर्गांमध्ये अनेक व्याख्याने दिली. महाराष्ट्रात जातीयवाद आणि हुकूमशाही मनोवृत्ती वाढत असताना, जातिधर्मातीत राष्ट्रवादी विचारांचा संस्कार तरुण पिढीवर करण्यासाठी संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेणाऱ्यामध्ये ना.ग. गोरे व शिरुभाऊ लिमये प्रमुख होते. या निर्णयातूनच १९४० साली राष्ट्रसेवा दलाची स्थापना करण्यात आली आणि एस. एम. जोशी सेवादलाचे प्रमुख झाले.

सेवादलात बौध्दिकांतून राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान सांगताना ना. ग. गोरे सांगत, 'भारताचा राष्ट्रवाद हिटलरच्या राष्ट्रवादासारखा राक्षसी, जग गिळंकृत करू पाहणारा नाही. आपला स्वातंत्र्य प्राप्त करण्याची इच्छा असणारा राष्ट्रवाद आहे. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी तुम्ही स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला पाहिजे'. १९४१ ते १९४६ हा ना. ग. गोरेंच्या जीवनातील कसोटीचा कालखंड होता. १९४० साली केलेल्या एका भाषणाबद्दल त्यांना निजामी तुरूंगात डांबण्यात आले. तुरूंगात ना. ग. गोरेंनी अनेक ग्रंथ वाचले, त्याचप्रमाणे त्यांच्याबरोबर असलेल्या तरूण कार्यकर्त्यांची बौध्दिक तयारी व्हावी. यासाठी व्याख्याने, चर्चा आदि कार्यक्रम सतत चालू ठेवले.२१

१९३९ साली महायुध्द सुरू झाले. स्वातंत्र्य लढा जवळ येणार हे दिसू लागले. सात प्रांतामध्ये काँग्रेसची मंत्रिमंडळे होती. त्यांना विचारात न घेता ब्रिटीशांनी महायुध्दात भारताच्या बाजूने सामील झाल्याचे जाहीर केले. याला तीव्र विरोध दर्शविण्यासाठी काँग्रेसच्या सर्व मंत्रिमंडळांनी ताबडतोब राजीनामे दिले. गांधीजींच्या अहिंसावादी भूमिकेवरून युध्दाला विरोध होताच युध्दाला अहिंसावादी भूमिकेतून विरोध म्हणून त्यांनी वैयक्तिक सत्याग्रह मोहिम सुरू करण्याचे ठरविले.

ना.ग. गोरे हे त्यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी होते. त्यामुळे त्यांची सत्याग्रही म्हणून निवड झाली. याच सुमारास जय प्रकाश नारायण आणि ना.ग. गोरे यांची भेट झाली. जयप्रकाश नारायण म्हणाले, युध्दजन्य परिस्थितीत केवळ सत्याग्रहाच्या मार्गाने चळवळ चालविणे पुरेसे नाही. एकीकडे देशव्यापी जनआंदोलन सुरू करून त्याच्या जोडीला भूमिगत चळवळही करावी लागेल. भूमिगत चळवळीमध्ये देशातील दळणवळण बंद पाडणे व यासाठी घातपाताचा कार्यक्रम हाती घेणे जेथे सरकारी यंत्रणा खिळखिळी करू, तेथे पर्यायी सरकार उभे करणे असा कार्यक्रम होता. ना.ग. गोरेंच्या मते, समाजवादी कार्यकर्ते अशा भूमिगत चळवळीत हिरीरीने भाग घेतील. त्यावेळी वैयक्तिक सत्याग्रहासाठी सत्याग्रही म्हणून त्यांची निवड झाली होती आणि सत्याग्रह करण्यापूर्वी प्रांतिक कमिटी जे प्रतिज्ञापत्रक करून देत असे. त्यामध्ये 'माझी अहिंसेवर पूर्ण श्रध्दा आहे.', असे लिहिलेले होते. ना.ग. गोरे हे सत्याग्रह करण्यास तयार होते, परंतु त्यांना भूमिगत चळवळ ही लढावयाची होती. त्यामुळे 'माझी अहिंसेवर पूर्ण श्रध्दा आहे' असे प्रतिज्ञापूर्वक लिहून देणे हे अप्रामाणिकपणाचे होईल असे त्यांना वाटले. या बाबतीत ना.ग. गोरे यांनी आचार्य जावडेकरांचा सल्ला घेतला व त्यांच्या सल्ल्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र न भरण्याचा निर्णय घेतला. यामुळे त्यांना शंकरराव देव यांची नाराजी ओढावून घ्यावी लागली. ना.ग. गोरे यांनी गुलबर्गा येथे गणपती उत्सवात जे भाषण केले होते, 'त्यामध्ये स्वातंत्र्यलढा लवकरच सुरू होईल आणि त्यावेळी हैद्राबाद संस्थानातील लोकांनाही या लढ्यात भाग घ्यावा लागेल' असे उद्‌गार काढले होते. गुलबर्गा हे त्यावेळी हैद्राबाद संस्थानात होते. या भाषणानंतर काही दिवसांनी गोरे घरी जात असताना एका इन्स्पेक्टरने त्यांना थांबवले. तो इन्स्पेक्टर निजाम सरकारचे वॉरंट घेऊन आला होता. गुलबर्गा येथील भाषणाबद्दल त्यांच्यावर अटक वॉरंट काढले होते. वॉरंट

पाहिल्यावर ना.ग. गोरे त्या इन्स्पेक्टर बरोबर गेले. पुढे ना. ग. गोरेंना १९४१ च्या एप्रिल महिन्यात एक वर्षाची शिक्षा झाली आणि त्यांना गुलबर्गा तुरूंगातच ठेवण्यात आले. १९३०-३२ साली झालेल्या कारावासात त्यांच्या समवेत त्यांचे मित्र होते. गुलबर्गा येथे असणारे कैदी हे गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगणारे कैदी होते. ना. ग. गोरे हे एकटे राजकीय कैदी होते. सुमतीबाई त्यांना भेटायला येत त्यावेळी काही पुस्तके घेऊन येत. तुरूंगात नियमाने लिहिलेली डायरीच पुढे 'कारागृहाच्या भिंती' या शिर्षकाखाली प्रसिध्द झाली. या पुस्तकात ना. ग. गोरे यांच्या मनाचा खंबीरपणा आणि चिंतनशीलता यांचा प्रत्यय येतो. तुरूंगातल्या एकाकी जीवनात येणारे विचार येथे भेटलेल्या काही गुन्हेगार कैद्यांच्या मानसिक अवस्थेचे चित्रण त्यांनी या पुस्तकात केले.

ना.ग. गोरे गुलबर्गा तुरूंगात होते. तेव्हा भारतात महात्मा गांधीजींनी ब्रिटीशांना 'चले जाव' असा आदेश दिला. त्यावेळी म. गांधी, पं. नेहरू आदी नेत्यांना अटक झाली. आणि देशव्यापी स्वातंत्र्य लढा सुरू झाला. वर्तमानपत्रातून लढ्याच्या बातम्या वाचताना ना. ग. गोरेंच्या मनाची तडफड होत होती. सुमतीबाईकडून हेही समजले की, त्यांचे मित्र भूमिगत झाले असून देशभर भूमिगत चळवळ चालली आहे. परंतु ते असहाय्य होते. डिसेंबर महिन्यात त्यांची तुरुंगातून सुटका झाली. ना. ग. गोरे सुटण्याची तारीख पुण्याच्या पोलीसांना माहित होती. गुलबर्गा तुरूंगातून सुटल्यावर ते रेल्वेने पुण्याकडे यावयास निघतील तेव्हा त्यांना सोलापूरला अटक करावयाची अशी योजना पोलीस अधिकाऱ्यांनी केली होती. अशा स्थितीत त्यांच्या कार्यकर्ते मित्रांना, ना.ग. गोरेंना सुखरूप कसे पोहचवायचे हाच प्रश्न होता. त्यांनी एक योजना आखली. ना. ग. गोरेंना तेथून नांदेडला जाऊन मनमाडवरून मुंबईकडे जाणाऱ्या मेलमध्ये दादरचे तिकीट काढून बसवले.

ना. ग. गोरे यांचा तुरुंगातून सूटल्यावर प्रवास झाला होता. ते प्रवासाने थकून गेले होते. दादरला ठरल्याप्रमाणे कार्यकर्ता ना. ग. गोरेना न्यायला आला होता. ना. ग. गोरेना त्या कार्यकर्त्याने ताडदेवला नेले. ताडदेवला एस.एम. जोशी, साने गुरुजी, शिरूभाऊ लिमये आदी नेते गुप्तपणे ज्या जागी राहीले होते तेथे रात्री ९.०० वाजता ना. ग. गोरे जाऊन पोहोचले. भूमिगतांच्या त्या जागेला शिरूभाऊ लिमये यांनी 'मूषक महाल' असे नाव दिले होते. ना. ग. गोरे यांची गुलबर्गा तुरूंगातून सुटका झाल्यावर ते पोलिसांच्या हातावर तुरी देऊन निसटले आणि भूमिगत झाले, ही बातमी वर्तमानपत्रात वाचल्यावर येरवडा जेलमधील त्यांच्या मित्रांना आणि कुटुंबाला फार अभिमान वाटला.

भूमिग्त असताना ना. ग. गोरे आणि एस. एम. जोशी गुप्तपणे दिल्लीला गेले. तेथे जयप्रकाश नारायण यांची भेट घेतली. महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यामध्ये सांगली, वाळवा, कराड या भागात नाना पाटील आणि त्यांचे सहकारी यांनी ब्रिटिश सरकार बरोबर गनिमी काव्याने झुंज देऊन स्थापन केलेल्या प्रती सरकारची तपशीलवार माहिती एस. एम. जोशी यांनी जयप्रकाशजींना दिली. नंतर झालेल्या भूमिगत नेत्यांच्या बैठकीत देशातील वेगवेगळ्या भागात जाऊन आलेल्या नेत्यांनी तेथील भूमिगत चळवळीचे वृत्त सांगितले. त्यावरुन बहुतेक ठिकाणी कार्यकर्ते पकडले. त्यमुळे चळवळ मंदावत चालली होती हे स्पष्ट झाले बैटकीत काहीसा निराशेचा सूर उमटत असताना जयप्रकाश नारायण म्हणाले 'सुभाषचंद्र बोस जर्मनीहून पाणबुडीने जपानला पोहोचले आणि त्यांनी रंगूनमध्ये "आझाद हिंद सरकार" स्थापन केले असून आझाद हिंद सेना उभारली आहे. सुभाषबाबूंची आझाद हिंद सेना जेव्हा भारताच्या भूमीवर पाय ठेवील त्यावेळी प्रथम ईशान्येकडील

भागात आणि नंतर देशभर उठाव होऊ शकेल. सुभाषबाबूंना भेटण्यासाठी मणिपूरमार्गे ब्रम्हदेशात जाण्याचा मी प्रयत्न करणार आहे.' जयप्रकाश नारायण यांच्याकडून मिळालेल्या या वार्तेमूळे एस.एम. जोशी आणि ना.ग. गोरे उत्साहाने मुंबईत परत आले. परंतु पुंढे काही दिवसांनी पोलीसांना मुंबईतील ताडदेव भागातील 'मूषक महाल' या जागेचा पत्ता लागला आणि एक दिवस सकाळी अचानक सर्वजण बेसावध असताना पोलीसांनी तेथे धाड घातली. ना.ग. गोरे आणि त्यांचे सर्व सहकारी बाहेर पडण्याच्या तयारीत असताना पोलीसांनी त्या सर्वांना पकडले. सर्वांना प्रथम आर्थर रोड तुरूंगात नेले. काही दिवस पोलीसांनी कसून चौकशी केली. परंतु ते सारेच दृढनिश्चयी होते. शिरुभाऊ लिमये यांना पुण्याला पाठवून नंतर येरवडा तुरुंगात 'फाशी गेट' या वॉर्डात ठेवण्यात आले. साने गुरुजींना येरवडा तुरुंगात पाठविण्यात आले. ना. ग. गोरे बरेच दिवस आर्थर रोड तुरूंगात होते. त्यांना काही दिवस भायखळा जेलमध्ये ठेवण्यात आले. काही महिन्यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनातील भूमिगत चळवळ चालविणारे सर्व प्रमुख नेते आणि कार्यकर्ते यांना पुण्याला येरवड्यात आणण्यात आले. सरकारने या सर्वांवर 'महाराष्ट्र कटाचा खटला' भरला. या कटात ४० जणांना आरोपी करण्याचे सरकारने ठरविले. त्यामध्ये ना.ग. गोरे आणि त्यांचे सहकारी हे प्रमुख आरोपी आणि अन्य काही कार्यकर्ते होते. यानंतर चौकशी करुनही पुरेसा पुरावा न मिळाल्यामुळे सरकारने महाराष्ट्र कटाचा खटला भरण्याचा बेत रद्द केला. प्रथम माफीचे साक्षीदार झालेल्या कार्यकर्त्यांनी सेशन्स कोर्टात आपल्या पूर्वीच्या जबान्या फिरविल्या प्रत्यक्ष घटना पाहिलेला कोणी साक्षीदार नसल्यामुळे सर्व आरोपी निर्दोष सुटले. १९४० च्या डिसेंबर महिन्यात ना.ग. गोरे यांना रस्त्यातच वॉरंट दाखवून अटक झाली होती. ते पाच वर्षांनी घरी आले. २२

१९४२ च्या सुरुवातीस ना. ग. गोरेंना युध्दविरोधी भाषणासाठी अटक झाली आणि एक वर्षाच्या कारावासाची सजा त्यांना मिळाली. ही सजा संपवून गुलबर्गा जेलमधून त्याची सुटका झाली. परंतु त्यांच्यावर स्थानबध्दतेचा हुकूम बजावण्यापूर्वीच ते १९४२ च्या आंदोलनातील भूमिगत नेत्यांना जाऊन मिळाले. साने गुरुजी, एस. एम. जोशी, शिरुभाऊ लिमये ह्यांच्या सहवासात त्यांनी भूमिगत कार्य सुरू केले. ह्याच काळात त्यांनी जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन आदी भूमिगत आंदोलनाच्या नेत्यांशी संपर्क साधला. भूमिगत कार्य करीत असतानाच ना. ग. गोरेंना साने गुरूजी, शिरूभाऊ लिमये, माधव लिमये आदि भूमिगतांसमवेत मुंबई येथील बॉम्बे सेंट्रलजवळील 'मूषक महाल' या भूमिगत केंद्रावर अटक झाली येरवडा, नाशिक, आर्थर रोड येथील तुरुंगातील स्थानबध्दतेनंतर १९४६ मध्ये ना.ग. गोरेंची सुटका झाली.२३

ना.ग. गोरेंची १९३० पासून सुरु झालेली जेलयात्रा अखेर संपली कारण ब्रिटीश सरकारने भारत सोडून परत जाण्याचा निर्णय घेतला होता. १९२६ साली 'यूथ लीग'च्या स्थापनेत ना.ग. गोरेंनी पुढाकार घेतला होता. १९३०,३२ आणि ४२ या तीन स्वातंत्र्य आंदोलनामध्ये ना.ग. गोरे यांनी हिरीरीने भाग घेतला. १९३०,३२ सालातील सत्याग्रह चळवळ ही अहिंसक होती. १९४२ साली भूमिगत चळवळ चालविताना त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मनुष्यहानी शक्य तो होऊ नये, अशी काळजी घेतली. स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी जो त्याग व बलिदान केले, त्यामुळे अनेकांच्या मनात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित झाली. स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या कार्याबद्दल आणि त्यागाबद्दल ना.ग. गोरेंच्या मनात नितांत आदर होता. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखालची १९२०, ३०, ३२ आणि १९४२ सालातील जनआंदोलनामुळे भारताला स्वातंत्र्य मिळाले. या लढ्यात ना.ग. गोरेंना सहभागी होता आले.

स्वातंत्र्य लढ्याबद्दल लिहिताना व बोलताना ना.ग. गोरे यांच्या लेखणीला व वाणीला स्फूरण चढत असे. परंतु स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या १९४६ ते ४७ या काळातील वाटाघाटीच्या काळात जे घडले त्याबद्दल त्यांचे मन अत्यंत दु:खी होते. देशभर झालेले हिंदू-मुसलमानांचे दंगे, नोआखालीचे भीषण हत्याकांड या पार्श्वभूमीवर चाललेल्या राजकीय वाटाघाटींमध्ये मुस्लिम लीगचे नेते बॅ. जिना यांनी चुकीची भूमिका घेतली आणि साम्राज्यवाद्यांनी त्यांना सतत पाठबळ दिले. यामुळे काँग्रेसच्या नेत्यांनी अखेर भारताची फाळणी मान्य केली. ना.ग. गोरे यांना स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगवास भोगताना मनाला जो उत्साह वाटला तो उत्साह १९४५ नंतरच्या राजकीय वाटाघाटी आणि अखेर झालेल्या देशाच्या फाळणीचा निर्णय यामुळे पार ओसरुन गेला. फाळणीच्या दिवसात पंजाब आणि बंगालमध्ये जे हत्याकांड झाले ते माणुसकीला काळीमा आणणारे होते. हे सर्व घडताना ना.ग. गोरे हे टाळण्यासाठी काहीच करु शकत नव्हते. याचे त्यांना फार दु:ख झाले. त्यांच्या जीवनातील हा अत्यंत दाहक अनुभव होता. अखेर १५ ऑगस्ट १९४७ ला गुलामीच्या शृंखला गळून पडल्या आणि भारत स्वतंत्र झाला. २४

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही ना.ग. गोरेंच्या जीवनातील तुरुंगवास संपला नाही. १९४९ मध्ये भारतात विलीन झालेल्या संस्थानात लोकशाही पध्दतीने विधानसभेवर लोकप्रतिनिधींची निवडणूक व्हावी या मागणीसाठी ना.ग. गोरेंनी सत्याग्रह केला आणि देहदंड सोसला.

१९५४ मध्ये गोवामुक्ती आंदोलनाचे नेतृत्व करीत असताना पोर्तुगीज पोलीसांनी ना.ग. गोरेंना तुरुंगात डांबले. गोवा पोर्तुगीजांच्या जोखडापासून मुक्त करण्यासाठी ना.ग. गोरेंनी गोव्यामध्ये सत्याग्रह केला. ना.ग. गोरेंना गोव्यातील

पोर्तुगीज कोर्टाने १७ वर्षाची सजा दिली. परंतु १९५७ मध्ये इतर नेत्यांसमवेत ना.ग. गोरेंची सुटका झाली.

१९५७ ते १९६२ या काळात ना.ग. गोरे लोकसभेत पुण्याचे खासदार म्हणून प्रतिनिधित्व करीत होते. १९५७ मध्ये ना.ग. गोरे संयुक्त महाराष्ट्र समिती पुरस्कृत प्रजा समाजवादी उमेदवार म्हणून पुणे शहरातून लोकसभेवर निवडून गेले. ना. ग. गोरेंनी लोकसभेच्या कार्यावर आपल्या प्रखर विचारांची छाप पाडली. या काळात त्यांनी संरक्षणाच्या समस्येत खूप रस घेतला. देशाच्या सीमेच्या रक्षणाबाबत कोणतीही तडजोड करू नये असे त्यांचे स्पष्ट मत होते.

१९६५ मध्ये वाराणसी येथील अधिवेशनात समाजवादी पक्षाचे प्रजासमाजवादी आणि संयुक्त समाजवादी पक्ष असे दोन पक्ष झाले. या कठीण समयी ना. ग. गोरेंनी प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारले आणि लोकशाही समाजवादी शक्ती मजबूत करण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

१९६७ मध्ये ना. ग. गोरे पुण्याचे महापौर झाले. त्यांच्या कार्यामुळे महापौरपदाची शान उंचावली गेली. ते नागरिकांच्या पैशातून सेवा न घेणारे उपभोगशून्य महापौर होते. महानगरपालिकेतील कामांत त्यांचा अभ्यासपूर्वक सहभाग असे. लोकांच्या अडी-अडचणी सोडवत असत. ना. ग. गोरे हे विज्ञाननिष्ठ होते. पुण्याचे महापौर असताना विज्ञानप्रेमी लोकांचा एक प्रातिनिधीक मेळावा पुण्यात झाला. त्यावेळी ना. ग. गोरेंनी निवडक वैज्ञानिकांचा सत्कार करून नागरिकांना विज्ञानाचे महत्त्व पटवून दिले.

१९७० ते १९७६ या काळात ना. ग. गोरे राज्यसभेचे सदस्य होते. त्यांनी राज्यसभेत प्रभावीपणे कार्य केले. १९७५ साली देशात आणीबाणी जाहीर झाली.

या काळात ना. ग. गोरेंनी देशभर भ्रमण करून जनतेस आणीबाणी विरूध्द जागृत केले. ना. ग. गोरेंनी त्यावेळी विरोधी पक्षाचे खासदार म्हणून संसदेत आणीबाणी ही लोकशाही नष्ट करणारी आहे असे स्पष्टपणे मांडून इंदिरा गांधीच्या धोरणावर कठोर टीका केली. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाऊन लोकांना निर्भयपणे आणीबाणीस विरोध करण्याचे आवाहन केले.

१९७७ मध्ये सर्व विरोधी पक्ष जनता पक्षात विलिन झाले. त्यानंतर सर्व पक्षांनी मिळून निवडणूक लढवली. जनतेच्या ऐक्याचे प्रतीक म्हणून जनता पक्ष उभा राहिला आणि प्रचंड बहुमताने हा पक्ष निवडून आला. जनता पक्षाची राजवट सुरू झाली. या राजवटीत ना. ग. गोरेंना भारताचे राजदूत म्हणून इंग्लंडला पाठवले. त्यांच्या कारकीर्दीत लंडनमधील 'भारत भवनाचे' दरवाजे सतत सर्वांसाठी उघडे राहिले. तेथील प्रशस्त सभागृहात भारतीय कलाकारांनी आपली कला सादर केली. याच काळात पासपोर्टचे नियम सोपे झाले. ना. ग. गोरेंनी इंग्लंडमधील भारतीय जनते करता खूप केले. भारतात जाताना काय काय व किती किमतीपर्यंतच्या वस्तू नेता येतात याबाबतचे नियम सोपे केले. 'इंडिया न्यूज' नावाचे इंडिया हाऊसचे साप्ताहिक बंद पडले होते. ते ना. ग. गोरेंनी सुरु केले. इंडिया हाऊसमधील समस्या तसेच इंग्लडमधील भारतीयांचे काही प्रश्न सोडविण्याचे कार्य त्यांनी केले. भारताचे राजदूत म्हणून महत्त्वाची जबाबदारी त्यांनी अतिशय कार्यक्षमतेने पार पाडली.

जनता सरकार कोसळल्यावर त्यांनी आपल्या पदाचा ताबडतोब राजीनामा दिला व ते भारतात परतले. यानंतरच्या काळात त्यांनी सक्रिय राजकारणात भाग घेतला नाही. १९८२ ते १९८५ या काळात ना. ग. गोरेंनी 'साधना' या साप्ताहिकाचे संपादक म्हणून काम पाहिले. लेखन, भाषण, संवाद चर्चा या माध्यमातून पुढे त्यांनी समाजप्रबोधनाचे काम केले. ना. ग. गोरे यांच्या जीवनात आणि

साहित्यात विचारांना प्राधान्य होते. स्वातंत्र्यसंग्राम आणि समाजवादी चळवळ यामधून त्यांचे जीवन तावून सलाखून निघाले. १ मे १९९३ ला पहाटे त्यांचे निधन झाले.

ना. ग. गोरेंनी वैचारिक लेखनही केले. रचना, जनवाणी, साधना, इंग्रजी जनता, साप्ताहिकाचे संपादक म्हणून वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली. ना. ग. गोरेनी पंडित नेहरुंच्या इंग्रजीमधील आत्मचरित्रांचा मराठीत अनुवाद केला. ना. ग. गोरे मासिकात नियमाने ललित लेखन आणि वैचारिक लेखही लिहीत. ग्रामीण भागातील सामाजिक विषमतेचे वास्तवदर्शन त्यांच्या लेखातून त्यांनी घडविले होते. मुंबईतील झोपडपट्ट्या वर 'वस्ती नंबर अकरा' हा कठोर वास्तवाचे चित्रण करणारा लेख लिहीला. रचना मासिकात कथा लेखन केले. 'सीतेचे पोहे', 'डाली' हे लेख प्रसिध्द झाले. ना. ग. गोरे यांनी स्त्रियांना समान वागणूक मिळावी हा विचार मांडणारे अनेक लेख लिहीले. 'पंडिता-रमाबाई-मुक्तीचा घंटानाद' हा त्याचा लेख स्त्री मुक्तीबद्दलची उत्कट आकांक्षा व्यक्त करणारा आहे. साम्राज्यशाही, विश्वकुटुंबवाद, मुरारीचे साळगांव ही त्यांची पुस्तके आहेत. 'उसासा' या कथेमध्ये स्त्री-जीवनाच्या उपेक्षेचे चित्रण केले आहे. ना. ग. गोरे समाजवादी पक्षातील आणि राष्ट्र सेवादलातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'जनवाणी', 'साधना' या साप्ताहिकांतून नियमाने लेखन करीत. ना. ग. गोरे यांच्या राजकीय लेखांचा दुसरा संग्रह 'ऐरणीवरील प्रश्न' हाही उद्बोधक आहे. इंग्लंडमध्ये हायकमिशनर असताना ना. ग. गोरे यांनी 'लोकसत्ता' दैनिकाच्या रविवार पुरवणीत 'तमसेच्या तीरावरुन' असे शीर्षक असलेले लेखन केले. या लेखांमधून ना. ग. गोरे यांनी युरोपमधील साम्यवादी देशांतील नव्या विचारप्रवाहांचे तर्कशुध्द विश्लेषण केले. ना. ग. गोरेंनी लिहिलेल्या निवडक प्रस्तावनाच्या 'पारख' या संग्रहाला त्यांच्या वैचारिक लेखनामध्ये विशेष महत्त्वाचे

स्थान आहे. तुरुंगातील कैद्याच्या अवस्थेचे वर्णन त्यांनी 'कारागृहाच्या भिंती' या पुस्तकात केले आहे. तसेच त्यांनी समाजवादी चळवळीला वैचारिक साहित्य मिळावे म्हणून ललित लेखन केले. ना. ग. गोरे हे साहित्यिक आणि राजकीय विचारवंत म्हणून ओळखले जातात.

ना. ग. गोरे हे समाजवादी विचारांचे नेते होते. समाजवादी विचार देशात रुजविण्याचे आणि समाजवादी विचाराने कार्यप्रवृत्त झालेल्या युवकांना वैचारिक मार्गदर्शन करण्याचे बहुमोल कार्य ना. ग. गोरे यांनी केले. त्यांच्यातील समाजवाद आगरकर, मार्क्स, गांधीजी, फूले, आंबेडकर यांच्या विचारधनातून घडलेला आहे. त्यामुळेच समाजकारण आणि राजकारण या दोन्ही गोष्टी एकमेकांना पुरक ठराव्यात असे त्यांचे स्पष्ट मत होते. राजकीय स्वातंत्र्याशिवाय सामाजिक सुधारणेस सामर्थ्य प्राप्त होत नाही व सामाजिक सुधारणेशिवाय राजकीय स्वातंत्र्यासही आशय प्राप्त होत नाही. ना. ग. गोरेंच्या राजकीय वाटचालीतील मूलतत्त्व होते. राजकीय, सामाजिक, आर्थिक सुधारणा घडवून आणण्यासाठी समाजवादी चळवळीचा त्यांनी आधार घेतला.

# संदर्भसूची


१. प्रधान ग.प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. १,२

२. गोरे ना. ग. - 'तिमिरातुनी तेजाकडे' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. १३३

३. उक्त पृष्ठ क्र. १३४

४. गोरे ना.ग. - 'तिमिरातुनी तेजाकडे' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. १३३

५. उक्त पृष्ठ क्र. १३३, १३५

६. जोशी एस.एम.- 'परममित्र' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. १३३

७. गोरे ना. ग. - 'तिमिरातुनी तेजाकडे' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. १३५

८. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. २, ३

९. उक्त पृष्ठ क्र. ४,५

१०. गोरे ना. ग. - 'तिमिरातुनी तेजाकडे' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. १३५

११. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. ५, ६

१२. उक्त पृष्ठ क्र. ११, १२

१३. दंडवते मधू - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल'
गोरे गौरव संपा - सदानंद वर्दे,
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन पृष्ठ क्र. १९

१४. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. १२, १३

१५. उक्त पृष्ठ क्र. १५

१६. दंडवते मधू - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल'
गोरे गौरव संपा - सदानंद वर्दे,
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन पृष्ठ क्र. २०

१७. जोशी एस.एम- 'मी अेसेम' अत्मकथा
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
पृ. क्र. ७३, २७२, २७३

१८. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. २०, २१

१९. गोरे ना. ग. - 'तिमिरातुनी तेजाकडे' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. १३७, १३८, १३९

१८. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. २०, २१

१९. गोरे ना.ग. 'तिमिरातुनी तेजाकडे' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. १३७, १३८, १३९

२०. प्रधान ग. प्र. 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मुंबई पृ. क्र. १८, १९

२१. प्रधान ग. प्र. - 'अंतरंगाच्या नाना छटा' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. ५०

२२. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५

२३. दंडवते मधु - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल' गोरे गौरव
संपा - सदानंद वर्दे श्री. पु. भागवत
मौज प्रकाशन मुंबई पृ. क्र. २१

२४. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. ३६, ३७